**प्रेस नोट** दि.०३/०८/२०१९

## कोरेगाव पार्क पोलीस स्टेशन, पुणे शहर

**कोरेगाव पार्क येथील उच्चभ्रू भागातील हॉटेल/पबवर महाराष्ट्र पोलीस कायदयांतर्गत कारवाई**

कोरेगाव पार्क परिसरातील हॉटेल हे रात्रौ उशिरापर्यंत चालू ठेवून खादय पदार्थांची विक्री केली जाते. तसेच हॉटेलमध्ये मोठया आवाजात स्पीकर वाजविले जातात, त्यामुळे तेथे राहणारे रहिवाशांना हॉटेलमधील लोकांचा व आवाजाचा त्रास होत असलेबाबतचे नागरिकांच्या तक्रारी कोरेगाव पार्क पोलीस स्टेशनला प्राप्त झाल्याने, मा. श्री.शिरीष सरदेशपांडे सो., पोलीस उप आयुक्त, परि.२, पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली श्री.मदन बहाद्दरपुरे, कोरेगाव पार्क पोलीस स्टेशन, पुणे शहर यांनी दि.०३/०८/२०१९ रोजी रात्रगस्त दरम्यान कोरेगाव पार्क भागातील हॉटेल स्पेस बार, हॉटेल तल्ली, हॉटेल रोबोस्ट या हॉटेल व पबविरूद्ध कारवाई करून, त्यांचेविरूद्ध महाराष्ट्र पोलीस कायदयांतर्गत न्यायालयामध्ये खटले दाखल केलेले आहे.

सदरची कारवाई ही मा. श्री.शिरीष सरदेशपांडे सो., पोलीस उप आयुक्त, परि.२, पुणे शहर, मा.श्रीमती डॉ.प्रिती टिपरे सो., सहा.पोलीस आयुक्त, लष्कर विभाग, पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली श्री. मदन बहाद्दरपुरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कोरेगाव पार्क पो.स्टे. पुणे व पोलीस कर्मचारी दिनेश शिंदे, रियाज शेख, गणेश हांडगर, उस्मान कारभारी, दशरथ सावंत यांनी केलेली आहे.

Bahaddarpure